# नव्या मेट्रो मार्चमध्ये दाखल होणार

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ भुयारी मार्गादरम्यान सध्या प्रोटोटाइप मेट्रोच्या माध्यमातून चाचण्या सुरू असून येत्या महिनाभरात दोन नव्या ट्रेन मेट्रो ३ ताफ्यात दाखल होणार आहेत. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या माध्यमातून सारिपूत नगर ते मरोळ नाका दरम्यान डायनॅमिक चाचण्या सुरू आहेत.

कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ मार्गिकेच्या पहिल्या टप्प्यादरम्यान म्हणजेच आरे ते बीकेसी दरम्यान ८४ टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यादरम्यान चाचण्यानंतर मेट्रो ३ साठी ९ मेट्रोची आवश्यकता आहे. कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ संपूर्ण मार्गिकेसाठी एकूण ३१ मेट्रो मुंबईत दाखल होणार आहेत, तर बीकेसी ते कफ परेड दुसऱ्या टप्प्यादरम्यान ७६ टक्के काम पूर्ण झाले असून कारशेडचे ५० टक्के काम अजूनही शिल्लक आहे.

पहिल्या टप्प्यातील कारशेडचे काम एप्रिल २०२३ मध्ये पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती भिडे यांनी दिली. तसेच दुसऱ्या टप्प्यातील कारशेडचे काम जुलै २०२३ मध्ये पूर्ण होईल. कारशेड पूर्ण करतानाच मेट्रो ३ मार्गिकेचा पहिला टप्पा (सिप्झ ते बीकेसी) डिसेंबर २०२३ मध्ये कार्यान्वित करण्यात येणार आहे. या पहिल्या टप्प्यासाठी सुरक्षा प्रमाणपत्र घेण्याच्या कामास जुलै-ऑगस्ट २०२३ मध्ये सुरुवात होईल, असे एमएमआरसीएल अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.